**"ऑक्टोबर २०२०" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

## (क) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक ८ ऑक्टोबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांचे एक आठवडयाचे सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम प्रशिक्षणासाठी जाताना करावयाची प्रशासकीय व्यवस्था करण्यासंदर्भात सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

- दिनांक ७ ऑक्टोबर २०२० च्या शासन निर्णयान्वये वित्तीय वर्ष २०२०-२१ करिता वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता सप्टेंबर २०२० साठी ३६-सहायक अनुदान (वेतन) या उद्दिष्टाखाली रु.३,५४,७०० इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे

- दिनांक १२ ऑक्टोबर २०२० च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) साठी बाहय यंत्रणेकडून मासिक दराने वाहनचालक पुरविण्यासाठी दिनांक १ ऑक्टोबर २०२० ते ३० नोव्हेंबर २०२१ या कालावधीसाठी मे.क्रिष्णा मोटर्स, जोगेश्वरी, मुंबई यांच्याशी करार करण्यात आला आहे.

- दिनांक १२ ऑक्टोबर २०२० च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा, पुणे या संस्थेस राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मुल्यमापन यंत्रणेंतर्गत सन २०१९-२० मध्ये संस्थेस प्रशिक्षण आराखडयानुसार निश्चित केलेल्या रु.१९३९.३५ लाख खर्चापैकी एप्रिल २०१९ ते फेब्रुवारी २०२० पर्यत प्रशिक्षण संस्थानिहाय झालेला रु.१७७६.७७ लाख खर्च व त्यांना वितरित करण्यात आलेला रु.१०००.०० लाख इतका निधी वगळता, रु.७७६.७७ लाख इतक्या वितरित करावयाच्या शिल्लक निधीपैकी सन २०२०-२१ मध्ये रु.२००.०० लाख इतके ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) मंजूर करण्यात आले आहे.

- दिनांक १३ ऑक्टोबर २०२० च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सन २०२०-२१ करिता वनामती, नागपूर संस्थेस ऑक्टोबर २०२० करिता ३६-सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली रु.७,०९,४००/- इतके अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

- दिनांक १४ ऑक्टोबर २०२० च्या शासन पत्रान्वये गट-अ, ब, क व ड अधिकारी / कर्मचारी यांची विभागीय चौकशी करण्यासाठी कंत्राटी तत्त्वावर नेमलेल्या ४३ सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांची नांवे वगळण्यात आली आहेत.

- दिनांक १४ ऑक्टोबर २०२० च्या शासन निर्णयान्वये निर्णयान्वये लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालयासाठी विविध संवर्गातील ५ नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत.

- दिनांक १३ ऑक्टोबर २०२० च्या शासन निर्णयान्वये सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातील श्री.म.भ.भामरे, सहायक कक्ष अधिकारी यांच्यासाठी निर्माण केलेले अधिसंख्य पद रद्द करण्यात आले आहे.

- दिनांक २० ऑक्टोबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या भविष्य निर्वाह निधीचे लेख्यांबाबत महालेखापाल कार्यालयाकडून पुरविण्यात येणारी विवरणपत्रे सेवार्थ प्रणालीतून काढून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

- दिनांक २० ऑक्टोबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्याबाबत पुन:श्च सूचना देण्यात आल्या आहेत.

- दिनांक २० ऑक्टोबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये आस्थापना मंडळाच्या बैठकीमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत संबंधित शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींच्या विहित केलेले मुद्दे विचारात घेऊन आढावा घेण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

- दिनांक २० ऑक्टोबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये दक्षता जनजागृती सप्ताह दिनांक २७ ऑक्टोबर २०२० ते २ नोव्हेंबर २०२० या कालावधीत साजरा / आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे.

- दिनांक २३ ऑक्टोबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये मत्ता व दायित्वे यांची वार्षिक विवरणपत्रे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**(ख) नियुक्ती / पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक**

- महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत २८० लिपिक-टंकलेखकांची मंत्रालयीन प्रशासकीय विभागात व बृहन्मुंबई राज्य शासनाच्या कार्यालयात नियुक्ती करण्यात आली आहे.
- एका लिपिक-टंकलेखकांनी सहायक कक्ष पदावरील पदोन्नती नाकारली आहे.

**(ग) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त**

- भारतीय प्रशासन सेवेतील २२ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- उच्चश्रेणी लघुलेखक-३, निम्नश्रेणी लघुलेखक-१ अशा ३ कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.
- सहायक कक्ष अधिकारी-५, निम्नश्रेणी लघुलेखक-१ अशा ६ कर्मचाऱ्यांच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.

**(घ) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन**

- अवर सचिव-१, सहायक कक्ष अधिकारी-९, लिपिक टंकलेखक-३ अशा १३ अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(च) प्रशिक्षण / परीक्षा**

- दिनांक ७ ऑक्टोबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांचे एक आठवडयाचे सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम प्रशिक्षणासाठी जाताना करावयाची प्रशासकीय करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत.

**(छ) ज्येष्ठतासूची**

- दिनांक २६ ऑक्टोबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील २३० निम्नश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२० रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २६ ऑक्टोबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ५६ निवडश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२० रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २६ ऑक्टोबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ९३ लघुटंकलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२० रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २६ ऑक्टोबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ३१ वरिष्ठ स्वीय सहायकांची दिनांक १ जानेवारी २०२० रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २६ ऑक्टोबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील २८६ उच्चश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२० रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

*****